**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

मुख्य अभियंता,मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक 422 004

डिजीटाईज्ड कालबद्ध सेवा वर्ष 2015

जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या

Http://wrd.maharashtra.gov.in

दूरध्वनी संपर्क -मुख्य अभियंता -253062,फॅक्स 2530251, 2530651,Email- mctanashik@gmail.com


जा.क्र. मसंसं/प्रशा/तांशा./सल्ला-तपासणी / ५१ /2018 दिनांक : १२ / 3/2018

प्रति

अधीक्षक अभियंता,

(धरण / दरवाजे / उसिंयो / कालवा) मंडळ ,

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक

**विषय :-** सल्लामसलत कामे/तपासणी कामे तसेच व्हीजीट फी चे दर सुधारित करणेबाबत

**संदर्भ:-**1) महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. मसंस २०१४/(प्र.क्र.३३४/१४) मोप्र-1 दि.१६/१/२०१५ व दि. १२/८/२०१५

2, मा.महासंचालक, (सजसंप्रवसु) मेरी, नाशिक यांच्या कार्यालयात, दि.६-१-२०१८ रोजी आयोजीत मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक-कार्यालयाशी संबधीत संकल्पने, रेखाचित्रे बाबत आढावा बैठकीचे मंजुर इतिवृत्त (मुद्दा क्र-७)

3) अधीक्षक अभियंता, प्रशासन , मसंस कार्यालयाचे पत्र जा.क्र. मसंसं/ मप्रक/ सल्लामसलत/428/२०११, दि. 4-10-2011

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडुन सल्लामसलत (Consultancy) तत्त्वावर करण्यात येतात. तसेच खाजगी सल्लागारामार्फत तयार केलेल्या धरणाच्या संकल्पनाची तपासणी (Vetting) देखील या संघटनेकडुन केली जाते.

सद्यस्थितीत संदर्भीय पत्र क्र ३ अन्वये सल्लामसलतीच्या कामाचा दर रु. 1,10,000/- प्रति रेखाचित्र व तपासणीच्या कामाचा दर रु. 55,000/- प्रति रेखाचित्र आहे. या दरास मा. महासंचालक यांनी दि. 14/9/2011 च्या कार्यालयीन टिप्पणी व्दारे मान्यता प्रदान केली आहे व सद्या उपरोक्त दर वापरात आहेत.

आता सन 2011 ते सन 2018 असा सात वर्षाचा कालावधी लोटला असून उपरोक्त दर आता खाली नमूद केल्या प्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

सदर दरांना मा. महासंचालक, संप्रजसवसु , मेरी यांनी दि. 7-3-2018 रोजी मंजुरी दिली असून आता खालील तक्त्यानुसार दर लागू राहतील.

Scanned with CamScanner

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | दि.6/3/18 पर्यंत प्रचलीत दर / प्रति रेखांचित्र | दि.7-3-2018 पासून सुधारीत मंजुर दर / प्रति रेखाचित्र |
|---|---|---|---|
| 1 | सल्लामसलतीचे काम | रु. 1,10,000/- | रु.1,60,000 /- |
| 2 | तपासणीचे काम | रु.55,000 /- | रु.1,20,000 /- |

तसेच सदरची कामे करीत असतांना कामांची क्षेत्रिय पहाणी करण्यासाठी प्रकल्पस्थळांना भेट देणे काहीवेळा आवश्यक असते. अशा पहाणीसाठी प्रत्येक प्रकल्प भेटीसाठी मानधन (व्हीजीट फी) चे सद्याचे प्रचलीत दर सुधारित करण्यात येत असून सुधारीत प्रस्तावीत दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदनाम | दि.6/3/18 पर्यंत प्रचलीत दर / प्रति रेखांचित्र | दि.7-3-2018 पासून सुधारीत मंजुर दर / प्रति रेखाचित्र |
|---|---|---|---|
| 1 | महासंचालक (संप्रसंजवसु) | रु. 5400/- | रु. 8000/- |
| 2 | मुख्य अभियंता (मसंस) | रु. 4500/- | रु. 6700/- |
| 3 | अधीक्षक अभियंता(मसंस) | रु. 3600/- | रु. 5300/- |
| 4 | कार्यकारी अभियंता(मसंस) | रु. 2700/- | रु.4000/- |
| 5 | उप विभागीय अभियंता (मसंस) | रु. 1800/- | रु.2600/- |

नविन सुधारीत दर दि.7-3-2018 पासून अंमलात येतील . इतर शासकीय कर / सेवा कर वेगळे आकारण्यात यावेत.

मुळ प्रतिवर मा.मुख्य अभियंता यांची स्वाक्षरी आहे.

**मुख्य अभियंता (करिता)**
**मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना**
**नाशिक-4**

प्रतः मा. प्रधान सचिव , (जसंप्रर्वव) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.

**( लक्षवेध:- श्री.तिरमनवार, शासनाचे उपसचिव, मो.प्र-१)**

प्रतः मा. महासंचालक, संप्रजसवसु, मेरी नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर

प्रतः सर्व,कार्यकारी संचालक,पाटबंधारे विकास महामंडळे.

प्रतः सर्व क्षेत्रीय मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.

प्रतः सर्व क्षेत्रिय अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.

प्रतः मुख्य अभियंता, यांत्रिकी , त्रंबकरोड, नाशिक

Scanned with CamScanner